“साप्ताहिक महाराष्ट्र” (Maharashtra This Week) या संकल्पनेंतर्गत दूरचित्रवाणी वाहिन्यांमार्फत मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषांबरोबरच इतर विविध भाषांमधून रिपोर्ताज/ बुलेटिनची निर्मिती/प्रसिध्दी करण्याकरीता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

**माहिती व जनसंपर्क विभाग,**

**शासन निर्णय क्र. मावज-२०२५/प्र.क्र.१३६/मावज-१**

मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.

दिनांक :- ५ ऑगस्ट, २०२६

**वाचा :-**

१. शासन निर्णय सा.प्र.वि.क्र.मावज-२०१८/प्र.क्र.२३९/कार्या-३४, दि.२६ मार्च २०२०
२. शासन निर्णय सा.प्र.वि.क्र.मावज-२०२५/प्र.क्र.१३६/मावज-१, दि.०२ जुलै २०२५.
३. शासन पूरक पत्रक क्र. मावज-२०२५/प्र.क्र.१३६/मावज-१, दि. २९ डिसेंबर, २०२५
४. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई वृत्तचित्र-२०२६-२७/साप्ताहिक महाराष्ट्र/का-७/१२५, दि.४ फेब्रुवारी, २०२६ चे पत्र.
५. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई वृत्तचित्र-(२०२६)/साप्ताहिक महाराष्ट्र/ का-७/७४३, दि.४ जून, २०२६ चे पत्र

**प्रस्तावना :-**

राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध लोकाभिमुख योजना, विकास प्रकल्प, ध्येय धोरणे, महत्त्वाकांक्षी प्रकल्प, विकासकामे व लोककल्याणकारी योजनांची विविध प्रसार माध्यमांद्वारे माहिती प्रसाराचे व जनजागृती करण्याचे कार्य माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत करण्यात येते. त्याकरिता सर्वंकष जाहिरात मोहिमांची आखणी व अंमलबजावणीचे काम करण्यात येते.

राज्य शासनामार्फत मंत्रिमंडळ बैठकीबरोबरच विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. मंत्री महोदयांद्वारे विविध निर्णय, योजना, उपक्रम जाहीर केले जातात. त्यांची त्या-त्या वेळी आणि नाविन्यपूर्ण पद्धतीने व्यापक प्रचार प्रसिद्धी होणे आवश्यक असते. ही प्रसिद्धी केंद्रिय पद्धतीने न करता विकेंद्रित पद्धतीने केल्यास ती अधिक परिणामकारक, प्रभावी होऊ शकते. सद्यस्थितीत दूरचित्रवाणी वृत्तवाहिन्यांची परिणामकारकता तुलनेने अधिक असल्याने सदर प्रसिद्धी मोहीम साप्ताहिक महाराष्ट्र (Maharashtra this week) या संकल्पनेंतर्गत दूरचित्रवाणी वृत्तवाहिन्यांद्वारे राबविण्याचे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने उक्त संदर्भाधिन क्र.४ व ५ च्या प्रस्तावान्वये प्रस्तावित केले आहे. प्रत्येक वृत्तवाहिनी या कार्यक्रमाची निर्मिती स्वतः करणार असल्याने कार्यक्रमात वैविध्य राहणार आहे. यासाठी सन २०२६-२७ या

आर्थिक वर्षात नियमित प्रसिद्धी मोहिमेअंतर्गत मराठी, हिंदी, इंग्रजी आणि विविध भाषांमधील दूरचित्रवाणी वृत्तवाहिन्यांद्वारे शासकीय योजना / उपक्रमांची प्रचार व प्रसिद्धी करण्यास आणि सर्व भाषेतील वृत्त आधारित डिजीटल माध्यमांद्वारे (News Related Digital Media) (उदा. युटयुब, वेब पोर्टल, विविध ॲप्स इत्यादी) प्रसार व प्रसिध्दी करण्यासाठी येणाऱ्या अंदाजित रु.८५,२२,३४,३५५/- (अक्षरी रुपये पंच्याऐंशी कोटी बावीस लक्ष चौतीस हजार तीनशे पंच्चावन्न फक्त) इतक्या खर्चाच्या माध्यम आराखड्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

वरील संदर्भाधीन क्र.४ व ५ येथील प्रस्ताव विचारात घेऊन दूरचित्रवाणी वाहिन्यांद्वारे (दृकश्राव्य माध्यम) सीबीसी (DAVP) दराने "साप्ताहिक महाराष्ट्र (Maharashtra this week)" या संकल्पनेंतर्गत रिपोर्ताज/बुलेटिन या कार्यक्रमाची निर्मिती व प्रसारण करण्यासाठी येणाऱ्या रु. ८५,२२,३४,३५५/- (अक्षरी रुपये पंच्याऐंशी कोटी बावीस लक्ष चौतीस हजार तीनशे पंच्चावन्न फक्त) एवढ्या अंदाजित खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

**२. नियमित प्रसिद्धी मोहिमेअंतर्गत द्यावयाचा अपेक्षित संदेश :-**

सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी मंत्रिमंडळ बैठकीबरोबरच विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. मंत्री महोदयांनी जाहीर केलेले विविध निर्णय, योजना, उपक्रमांची त्या-त्या वेळी आणि नाविन्यपूर्ण पद्धतीने प्रचार प्रसिद्धी करणे असा राहील.

**३. मोहिमेचा कालावधी :-**

"साप्ताहिक महाराष्ट्र" (Maharashtra This Week) या संकल्पने अंतर्गत करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचा कालावधी दिनांक १ एप्रिल, २०२६ ते ३१ मार्च, २०२७ पर्यंत राहील.

४. रिपोर्ताज/बुलेटीन निर्मिती प्रसारणाची प्रक्रिया यासंदर्भात माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने संदर्भाधीन क्र.४ व ५ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अटी व शर्ती निश्चित करुन संबंधित वृत्तवाहिन्यांना आवश्यक कार्यादेश देण्यात यावेत व या कार्यादेशानुसार कार्यक्रमाच्या निर्मिती प्रसारणाची प्रकिया राबवावी.

५. बहुतांश वेळा राज्य व केंद्र शासनाच्या सहकार्याने महाराष्ट्र राज्यात अर्थ, तंत्रज्ञान, विज्ञान, कृषी, उद्योग, शिक्षण, पायाभूत सुविधा, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी विषयांच्या अनुषंगाने राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रम/उपक्रम आयोजित करण्यात येतात. या कार्यक्रमाच्य प्रसिध्दीसाठी महासंचालनालयाच्या उक्त संदर्भाधीन क्र.४ येथील प्रस्तावात नसलेल्या त्या-त्या विषयांशी निगडीत असलेल्या वृत्तवाहिन्या किंवा महासंचालनालय ठरवेल अशा वृत्तवाहिन्यांना ५ मिनिटांचे रिपोर्ताज/बुलेटिन तयार करण्याचे कार्यादेश दण्याचे अधिकार महासंचालकांना असतील. "साप्ताहिक महाराष्ट्र च्या धर्तीवर संदर्भाधीन क्र.४ व ५ येथील प्रस्तावात नमूद वृत्तवाहिन्यांच्या व्यतिरिक्त अन्य वाहिन्यांना कार्यादेश द्यावयाचे झाल्यास त्याकरीता उक्त एकूण अंदाजित खर्चाच्या रकमेमध्ये अतिरीक्त ५% इतकी खर्चाची रक्कम अंतर्भूत केली आहे.

६. माध्यम संस्थांनी आपल्या एका वृत्तवाहिनीवरून या कार्यक्रमाची निर्मिती केल्यानंतर त्यांच्या इतर भाषेतील वृत्तवाहिन्यांवरून याच कार्यक्रमाचे मोफत डबिंग करून प्रसारित करावयाचे असल्यास त्यांना सदरहू ५% इतक्या राखीव निधीतून केवळ प्रसारणाचे कार्यादेश देण्यात येतील.

७. नियमित प्रसिद्धी मोहीम राबविण्यासाठी येणाऱ्या खर्चाची एकूण रक्कम अंदाजित असून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संदर्भाधीन क्र.४ व ५ येथील प्रस्तावात नमूद एखाद्या वृत्तवाहिनीद्वारे यासंदर्भातील प्रसिद्धी न झाल्यास सदर वृत्तवाहिनीकरीता दर्शविलेली रक्कम प्रस्तावातील इतर कोणत्याही वृत्तवाहिनीसाठी आवश्यकतेनुसार वापरण्यास तसेच एखाद्या वृत्तवाहिनीत बदल करण्यास अथवा एखाद्या नवीन वृत्तवाहिनीचा समावेश (अंदाजित खर्चाच्या एकूण मर्यादेत) करण्यास तसेच वरील प्रसिद्धी आराखड्यानुसार कार्यवाही करताना जाहिरातीचा कालावधी आणि वारंवारिता ठरविण्याबाबतचे अधिकार महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांना असतील.

८. सदरची मान्यता पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

I. प्रस्तावित कामांसाठी दर/निवड करावयाच्या संस्था / प्रस्तावित माध्यम आराखड्याचा खर्च करतांना, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय, वित्त विभागाने/शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेऊन तसेच उद्योग ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय दि.१/१२/२०१६ तसेच तद्नंतर वेळोवेळी निर्गमित शासन निर्णयामध्ये नमूद अटी, शर्ती व कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

II. रिपोर्ताज/बुलेटीन निर्मिती प्रसारणाची प्रक्रिया माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने सादर केलेल्या प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे राबविण्यात येत असल्याची खातरजमा करण्याची सर्वस्वी जबाबदारी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची राहील. तसेच रिपोर्ताज/बुलेटिनसाठी कमी दर असलेल्या प्रसिध्दी माध्यमांची निवड करण्याची तसेच रिपोर्ताज/बुलेटिनची द्विरुक्ती न होण्याची दक्षता महासंचालनायालने घ्याची.

III. राज्याची महसूली तूट, राजकोषिय दायित्व तसेच शासनाने घोषित केलेल्या नवीन योजना यामुळे शासनावर मोठ्या प्रमाणात येणारा भार या बाबी विचारात घेता तसेच राज्याची आर्थिक परिस्थिती पाहता, खर्चात बचत करणे आवश्यक आहे. सबब अनावश्यक खर्च टाळून अनुत्पादक खर्च नियंत्रित ठेवणे आवश्यक आहे.

IV. सदर खर्च प्रस्तावाधीन लेखाशीर्षांतर्गत अर्थसंकल्पित तरतुदीतूनच भागविण्यात यावा. याकरीता कोणताही अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

V. सदर खर्च सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.२६.३.२०२० मध्ये नमूद वित्तीय अधिकाराच्या मर्यादेत करावा.

VI. प्रस्तावित कार्यक्रमाकरीता येणारा खर्च दि.३१ मार्च २०२७ पर्यंत करण्यात यावा. तसेच प्रत्यक्ष खर्च उपलब्ध निधीच्या मर्यादेत, लागू असलेल्या शासन निर्णय, वित्तीय नियम व विहित करण्यात आलेल्या दरानुसारच करण्यात यावा.

VII. प्रस्तावित कार्यक्रमाची देयके अदा करण्यापूर्वी संबंधित कार्यक्रमाचे प्रत्यक्ष निर्मिती व प्रसारण झाल्याची पडताळणी, आवश्यक प्रमाणपत्रे व अभिलेख उपलब्ध करूनच विहित वेळेत देयके अदा करण्यात येतील याची सर्वस्वी जबाबदारी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची राहील.

VIII. शासनाच्या योजना/निर्णयांची प्रसिद्धी आधीच इतर विभागाकडून माहिती व जनसंपर्क संचालनालयाव्दारे होत असल्यास स्वतंत्र रिपोर्ताज/बुलेटिन तसेच जाहिराती आवश्यक आहेत का, याची तपासणी करूनच प्रस्तावित कार्यक्रमा अंतर्गत जाहिराती प्रसिध्द करण्यात येवून जाहिरातींची व्दिरुक्ती होणार नाही याची दक्षता माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने घ्यावी.

९. प्रस्तुतचा खर्च सामान्य प्रशासन विभाग, मागणी क्र.ए-६, २२२०-माहिती व प्रसिध्दी, ६०-इतर, १०१ जाहिरात व दृक प्रसिध्दी (००) (०३) शासकीय योजनांची विशेष प्रसिध्दी मोहीम (योजनांतर्गत), २६-जाहिरात व प्रसिध्दी (संगणक सांकेतांक क्र.२२२०११७५) या लेखाशीर्षांतर्गत सन २०२६-२७ मधील मंजूर अनुदानातून बीम्स प्रणालीवर उपलब्ध तरतुदींच्या मर्यादेत आवश्यक व महत्त्वाच्या बाबींवर करण्यात यावा.

१०. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५७/१४४३, दि.२५.०३.२०२६ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४४९/व्यय-४, दि.०२.०८.२०२६ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा संकेतांक २०२६०८०५१४५९०१८८३८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SARIKA UTTAM PATIL

Digitally signed by SARIKA UTTAM PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=aa374b566d78c73e42804a2013f949268134e97ca9f7b2458c4247baf4c72175, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6401C88A0E0E14D8299DD0F14BA71419FCC6EE4670C193CBF1EB58127FA5947D, cn=SARIKA UTTAM PATIL
Date: 2026.08.05 15:00:22 +05'30'

**( सारिका उ. पाटील )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२

३) मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२

४) मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२

५) मा. सभापती, महाराष्ट्र विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

६) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७) मा. उपसभापती, महाराष्ट्र विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
८) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
९) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१०) सर्व मा. विधान परिषद/विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
११) अ.मु.स./प्र.स./सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१२) सहसचिव, वित्त विभाग (कार्या-व्यय-४), मंत्रालय, मुंबई - ३२.
१३) सहसचिव, नियोजन विभाग (कार्या-१४४३), मंत्रालय, मुंबई-३२
१४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
१५) उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१६) महालेखापाल, १/२ (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखापरीक्षा), मुंबई, नागपूर,
१७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१८) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
१९) लेखाधिकारी (आहरण व संवितरण), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२०) मंत्रालयाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख.
२१) भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.कुटीर क्र.१, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२०.
२२) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (इं.) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-४०० ०२५.
२३) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, ठाकरसी हाऊस, जे. एन. हेरेडिया मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-३८.
२४) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०० ०२८.
२५) बहुजन समाज पक्ष, प्रदेश सचिव, महाराष्ट्र राज्य, बी. एस. जी. भवन, भूखंड क्र.८३-ए, कलेक्टर कॉलनी, चेंबूर, मुंबई-४०० ०७४.
२६) भारतीय कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र समिती, ३१४, राजभवन, एस.व्ही.पटेल मार्ग, मुंबई-४.
२७) भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पक्ष, महाराष्ट्र समिती, जनशक्ती सभागृह, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-४०० ०१३.
२८) महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई-२८.
२९) निवडनस्ती (मावज-१), सामान्य प्रशासन विभाग.